# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५

## (सकाळी ०९.३० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)**

(१) **श्री. मुरजी पटेल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील:-**

"अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघामध्ये मुंबईतील एकमेव औद्योगिक वसाहत असणे, औद्योगिक क्षेत्र असल्यामुळे या ठिकाणी कामगार, कर्मचारी व मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, परंतु या परिसरात शासनाचे किंबहुना महापालिकेचे एकही सुसज्ज रुग्णालय नसणे, त्यामुळे येथील नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नसणे, येथील कामगार, कर्मचारी व मजुरांची संख्या लक्षात घेऊन भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालया अंतर्गत येत असलेले राज्य विमा योजनेचे (ESIC) हॉस्पिटलची स्थापन करणे, परंतु २०१८ मध्ये सदर हॉस्पिटलला आग लागणे व त्यात जवळपास दहा व्यक्तींचा मृत्यू होणे, तेव्हापासून सदरचे हॉस्पिटल बंद असणे, येथील नागरिकांची रुग्णालयाअभावी होणारी गैरसोय लक्षात घेऊन सदरचे कामगार हॉस्पिटल तातडीने सर्वसामान्यांसाठी सुरू करून त्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना सुरू करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) सर्वश्री. अभिजीत पाटील, नारायण पाटील वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"माढा (जि. सोलापूर) तालुक्यातील सीना माढा सिंचन योजना २००४ साली कार्यान्वीत होणे, सदर योजनेतील कन्हेरगाव, दहिवली, निमगाव टे., वरवडे, सापटणे टे., चिंचोली, अरण, भेंड, भुताष्टे, कुर्डु, लवूळ यासह इतर गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी भूसंपादन करणे, भूसंपादीत केलेल्या जमीनींचा मोबदला देण्यासाठी ३५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर असून यापैकी २१ कोटी रुपये निधीची मागणी कृष्णा खोरे विकास महामंडळाने शासनाकडे केलेली असणे, तसेच सदर योजनेंतर्गत १६ हजार हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार असून त्यापैकी १४ हजार हेक्टर क्षेत्र सध्या ओलिताखाली आलेले असणे, परंतु बावी, तुळशी, कुर्डू, परितेवाडी, पिंपळखुंटे, अंबाड, अंजनगाव, खेलोवा ही गावे या योजनेपासून वंचित असणे, सदर सिंचन योजनेच्या तृतीय सुप्रमाला मंजुरी देऊन

निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनीही मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, तथापि अद्याप तृतीय सुप्रमाला मंजूरी देण्यात आलेली नसणे, शासनाने सीना माढा सिंचन योजनेच्या तृतीय सुप्रमाच्या उक्त प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पणन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"एक सदस्यीय पी.एल.खंडागळे समितीचा १४ पानी चौकशी अहवाल पणन संचालक यांना दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी व त्यापूर्वी दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी के.डी.पाटील जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांचा चौकशी अहवाल शासनास सादर होणे, दोन्ही चौकशी अहवालात नागपूर कृ.उ.बा.स.संचालक मंडळाचा भ्रष्टाचार उघडकीस आला असून संचालकांनी परिवाराच्या नावाने गाळे घेणे व सभापती यांनी परिवारातील सदस्यांना गाळे आवंटीत करणे, सभापती यांनी अधिकार नसताना दोन गाळयांचे सबलिज रजिस्टर करून घेणे, अधिनियम १९६३ नियम १९६७ मधील नियम ६(४) अपात्र असताना गाळा प्राप्त करून घेणे व लिलाव न करता स्वमर्जीने संचालक व अन्य लोकांना थेट गाळे देणे, या प्रकरणात तत्कालीन सचिवांचा समावेश असणे, सादर झालेला चौकशी अहवाल शासनस्तरावर दाबून ठेवणे यात एका नेत्याचा समावेश असण्याची शक्यता असणे, खंडागळे समितीचा चौकशी अहवालात APMC मधील बकरामंडी सेसच्या माध्यमातून ५१ दलाल व अधिकाऱ्यांनी शासनाचा अंदाजे ४० कोटीचा महसूल बुडविणे, २० वर्षात ९५,०००/- सेस दाखवणे, ३ वर्षात सेस 'निल' दाखवणे, सादर अहवालाचे अनुषंगाने ५१ बकरामंडी दलाल यांचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी परवाने रद्द करून दंडासहित वसुली करण्याचे पणन संचालक यांनी दिलेले आदेश, सचिव द्वारा जाणीवपूर्वक कारवाईत विलंब करून दलालांना न्यायालयात जाण्याची संधी देणे, दोन्ही चौकशी अहवालात जाणीवपूर्वक शासनाचे महसूल बुडविल्याचे गंभीर स्वरूपाचे आरोप असणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) सर्वश्री. साजिद पठाण, नानाभाऊ पटोले, विकास ठाकरे, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री. अस्लम शेख, अमिन पटेल, श्रीमती ज्योती गायकवाड, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वित्त व नियोजन विभाग, सन २००१ मध्ये डॉ. भांडे समितीचा रिपोर्ट आल्यावर तब्बल २० वर्षांनी राज्य शासनाने सन २०१९ मध्ये अहवाल स्विकारला असणे, असे असतांनाही राज्यातील धोबी समाजाला सन २००१ मध्ये डॉ. भांडे समितीच्या तिसऱ्या अहवालातील शिफारशीनुसार तात्काळ सवलती प्रामुख्याने आरक्षण देण्यास विलंब होत असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, समितीच्या तिसऱ्या शिफारशीमध्ये स्पष्ट उल्लेख असतानाही धोबी समाजाला त्या समाजाच्या संख्येच्या प्रमाणात तत्सम सवलती लागू करण्याची आवश्यकता असणे, धोबी समाजाला कुठलेही आरक्षण न देता फक्त अन्याय सुरु असणे, बार्टीच्या अहवालाची आवश्यकता नसतानाही शासनाकडून

त्याबाबत आग्रह धरण्यात येणे, मागील अनेक वर्षांपासून धोबी समाजाचे आरक्षण प्रलंबित असणे, आरक्षणास होत असलेल्या विलंबामुळे धोबी समाजातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली चिड व असंतोष लक्षात घेता शासनाने धोबी समाजाला त्वरीत आरक्षण मिळवून देण्याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक विधानसभा क्षेत्रातील महिरावणी, ता. नाशिक येथील महात्मा फुले संस्थेच्या सावित्रीबाई फुले माध्यमिक आश्रमशाळेत मोठ्या प्रमाणात गंभीर स्वरुपाची अनिमितता उघड होणे, दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या सचिव, आदिवासी विभाग यांना सादर करण्यात आलेल्या अहवालात सदर संस्थेबाबत अनेक बाबी उघड होणे, सदर संस्थेची जमीन एन.ए.केलेली नसणे, सदर संस्थेने विनापरवानगी बांधकाम करणे, सदर बांधकामास कायदेशीर परवानगी नसणे, संस्थेने अनेक बोगस कागदपत्रे तयार करुन शासनाची फसवणूक करणे, सदर संस्थेचे कार्यकारी मंडळ नियमबाह्य पध्दतीने कार्यान्वित करणे, महात्मा फुले बहुउद्देशीय संस्थेने जिजाऊ प्राथमिक व सावित्रीबाई फुले माध्यमिक आश्रमशाळा महिरावणी, ता.जि.नाशिक या शाळेसाठी मौजे महिरावणी येथे भाड्याने घेतलेल्या मिळकतीवर अनधिकृत बांधकाम करुन त्याआधारे जागा मालकांना अंधारात ठेऊन शासनाकडून जादा दराने इमारत भाडे रक्कम मिळविण्याचे हेतूने जागा मालकांच्या बनावट पावत्या बनवून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर बाब उघड होणे, या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री. मनोज घोरपडे, श्रीमती श्वेता महाले, श्री. विक्रम पाचपुते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात सन २०१२ पासून गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू यांसारख्या आरोग्यास अपायकारक अन्नपदार्थांचे सेवन व विक्री याबाबत बंदी असणे, गुटखा बंदी प्रतिबंधात्मक कारवाईच्या दृष्टीने यावरील अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन (FDA) आणि पोलीस प्रशासन यांच्याकडून संयुक्तपणे कारवाई होत असणे, राज्यातील विविध शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा तस्करी होत असणे, परंतु अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्यालयातील सह आयुक्त यांनी सह संचालक, छत्रपती संभाजीनगर यांना बेकायदेशीरपणे आदेश दिल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आलेले असणे, या आदेशामुळे एफडीए आणि पोलीस यांच्या संयुक्त कार्यवाहीस अडथळा निर्माण झालेला असणे, छत्रपती संभाजीनगर येथील पोलिसांनी मोठ्या प्रमाणात जप्त केलेले अन्नपदार्थांचे नमुने अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी घेण्यास नकार दिल्यामुळे पुराव्यांअभावी पोलिसांकडून गुन्हे नोंदवले जात नसणे, प्रशासनाच्या अशा चुकीच्या निर्णयांमुळे राज्यात गुटखा विक्रीचे प्रमाण वाढत चालले असून यावर खटले चालवले जात नसणे, सरकारकडून विक्रेत्यांना अप्रत्यक्ष संरक्षण दिल्याने जनतेच्या मनात संभ्रमाचे वातावरण पसरलेले असणे, राज्यात गुटखा बंदीसाठी शासनाकडून कडक कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**कृषी मंत्री :** "राज्यात बियाणांच्या व खतांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत" या विषयावरील श्री.विजय वडेट्टीवार व इतर वि.स.स. यांचा दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ६४७३० च्या अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**तीन : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(१) श्री.निलेश राणे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात १९ व २० मे, २०२५ दरम्यान पडलेला अवकाळी पाऊस, या अवकाळी पावसामुळे कोकणासह इतर जिल्ह्यामध्ये झाडे, घरे, विद्युत खांब, रस्ते आदिंचे झालेले नुकसान, जिल्ह्यात आधीच विद्युत तारा अत्यंत जीर्ण व जुन्या झालेल्या असल्याने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वीज वितरण यंत्रणेची झालेली दयनीय अवस्था, जिल्ह्यात विजेचे खांब पडून अनेक ठिकाणी दुर्घटना घडलेल्या असणे, पावसाळ्यात वारंवार वीज पुरवठा खंडीत होणे, बहुतांश गावे अंधारात असणे, शहरातील अनेक वीज खांब कमकुवत होणे, वीज वाहिन्या लोंबकळत असणे, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका असणे, काही ठिकाणी कमी दाबाने वीज पुरवठा होत असणे, मालवण (जि. सिंधुदुर्ग) शहरात ऐन पर्यटन हंगामात देवबाग, तारकर्ली, वायरी परिसरात अत्यंत कमी दाबाच्या वीज पुरवठ्यामुळे पर्यटकांची मोठी गैरसोय होणे, या भागात स्वतंत्र वीज उपकेंद्र तसेच नव्याने बसविण्यात आलेल्या विद्युत रोहित्रांची जोडणी आणि निकृष्ट दर्जाच्या भूमिगत वीज वाहिन्यांची कामे झाल्याचेही निदर्शनास येणे, निकृष्ट दर्जाच्या कामांमुळे उक्त तिन्ही गावातील पर्यटक व्यावसायिकांनी महावितरणच्या कार्यालयावर धडक देऊन संबंधित अधिकारी तसेच संबंधित ठेकेदाराला धारेवर धरणे, उक्त तिन्ही गावासाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र देण्याबाबत मागणी होऊनही महावितरणाकडून अद्यापी कार्यवाही झालेली नसणे, जिल्ह्यातील बांद्रा पंचक्रोशी तीलमुडा रेणापाल, पाडळसे निगुडे, कास सातोसे, आगरस या गावांमध्ये वीजखांब व वाहिन्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असणे, कुडाळ

तालुक्यात महावितरणने सुरु केलेली टोलफ्री यंत्रणाच कुचकामी ठरत असणे, जिल्ह्यातील विजेच्या यंत्रणेला अद्ययावत करण्यासाठी जास्त निधीची असलेली आवश्यकता, जिल्ह्यातील विकासकामांना बसलेली खीळ, महावितरणाच्या गलथान कारभाराबाबत सखोल चौकशी करुन कामचुकार अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक महानगरपालिका अंतर्गत ठेकेदारीवर विविध कामांसाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर कर्मचाऱ्यांची फसवणूक ठेकेदाराकडून करण्यात येणे, या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायदे अंतर्गत वेतन देणे गरजेचे असताना त्यांच्या खात्यातून बेकायदेशीरपणे रक्कम काढून घेणे, सदर काढून घेतलेल्या रकमेचा वापर भ्रष्टाचारासाठी केला जाणे, भारताच्या संविधानाने तक्रार करण्याचे कर्मचाऱ्यांना दिलेले अधिकार ठेकेदाराकडून काढून घेण्यात येणे, नोकरीची गरज असल्यामुळे कर्मचाऱ्यांकडून स्टॅम्प पेपरवर स्वाक्षरी करून घेणे, अशा प्रकारे कोऱ्या स्टॅम्प पेपरवर सही करून घेणे बेकायदेशीर असताना देखील नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, संघटीतपणे भ्रष्टाचार करण्यासाठी व महानगरपालिकेची लूट करण्यासाठी ठेकेदार व अधिकारी यांच्याकडून सुरू असणारी कार्यवाही, याबाबत कामगार विभाग व पोलीस विभाग यांचे होत असलेले दुर्लक्ष, सदर भ्रष्टाचार थांबविण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**(३) श्री. सुनिल शेळके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

" तळेगाव-दाभाडे ता.मावळ जि. पुणे येथे दिनांक २७ जून २०२३ रोजी पिंपरी चिंचवड पोलिसांनी २ जणांना ४ पिस्तुल व १४ जिवंत काडतुसांसह पकडले असून त्यांची कसून चौकशी केली असतां स्थानिक लोकप्रतिनिधींना जीवे मारण्याचा कट रचण्यात आला असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, पोलिसांच्या सतर्कतेमुळे व खबरदारीमुळे सदर घटना उघडकीस येणे, अटक करण्यात आलेल्या आरोपींवर खून, खूनाचा प्रयत्न, जाळपोळ, खंडणी, बेकायदेशीर हत्यारे बाळगणे, लूट, वाहनांची तोडफोड आणि दंगल असे अनेक गंभीर गुन्हे दाखल असणे. याच प्रकरणात दिनांक ६ जुलै २०२३ रोजी अन्य पाच गुन्हेगारांना अटक करुन त्यांच्या जवळील सात पिस्तुले, २१ काडतुसे जप्त करण्यात येणे, सदर आरोपींचा लोकप्रतिनिधींशी आर्थिक व राजकीय संबंध नसताना हत्त्येचा कट रचण्यात आला असणे, अलिकडेच सदर आरोपी जामिनावर बाहेर असून त्यांच्यावर मोका अंतर्गत कारवाई सुरू असणे, त्यांना तडीपार करण्यात आले असतानाही ते सदर परिसरात राजरोसपणे फिरत असून कटकारस्थान करीत असणे, या गुन्हेगारांना राजकीय पुढाऱ्यांचा पाठिंबा

असल्यामुळेच गुन्हेगारी प्रवृत्ती वाढल्यामुळे या परिसरातील जनमानसात पसरलेली भिती व घबराट, या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करुन या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची भुमिका."

**(४) श्री.कैलास घाडगे पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"धाराशिव जिल्ह्यात अनेक खाजगी कंपन्यामार्फत पवनचक्की उभारण्याची कामे हाती घेण्यात आलेली असणे, पवनचक्की कंपन्यांकडून स्थानिक गुंड व पोलीस अधिकारी यांना हाताशी धरुन शेतक-यांना असमान पध्दतीने मावेजा वाटप करणे, दमदाटी करणे, मावेजा न देता शेतक-यांना दमदाटी करुन काम करुन घेणे, जमीन भाडेपट्टीने घेण्याच्या दस्तामध्ये शेतक-यांच्या परस्पर खोट्या सह्या करुन खोटी शपथपत्र सादर करुन बोगस दस्त तयार करणे, शेतक-यांच्या मावेजाबाबतीत खोटी धनादेश देऊन पवनचक्कीच्या संबंधित कामे करुन घेणे, धनादेश बँकेत जमा केल्यानंतर धनादेश न वटणे, शेतक-यांची फसवणूक झाल्याने शेतकरी गेल्या ७ दिवसापासून उपोषणाला बसणे, याबाबत प्रशासनाकडून कोणतीच दखल घेण्यात न येणे, सदर प्रकरणी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करुनही त्यांना न्याय न मिळणे, उपविभागीय पोलीस अधिका-यांसह स्थानिक गुंडांकडून शेतक-यांना शेतात त्यांनीच लावलेल्या ऊसाने मारहाण करणे, शेतक-यांना पोलीस स्टेशनमध्ये डांबून ठेवून पवनचक्की कंपनीचे काम करणे, पवनचक्की संनियंत्रण समिती उपविभागीय स्तरावर तसेच जिल्हाधिकारी स्तरावर शेकडो तक्रारी प्राप्त असून देखील त्याचे निराकरण न करणे, खोट्या सह्या व बनावट शपथपत्रांच्या आधारे झालेल्या दस्ताबाबत शेतक-यांनी तक्रारी देऊनही पोलीस प्रशासनाने जाणीवपुर्वक तक्रार दाखल करुन न घेणे, शासनाने उक्त प्रकरणी तात्काळ चौकशी करुन दोषी असलेल्या पोलीस अधिका-यांवर संनियंत्रण समितीने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील महानगर पालिका, नगर परिषदा, मेट्रो महानगर पालिका क्षेत्रांतर्गत मालमत्ता विक्री, देणगी किंवा फलोभोग गहाण संलेख्यांद्वारे (सरकारी पावती लेखा प्रणाली) दस्ताची नोंदणी करतांना वसूल करण्यात आलेला १ टक्के अतिरिक्त मुद्रांक शुल्क अधिभार महानगर पालिका, नगर परिषदा, महानगर पालिका, यांना वितरीत करण्यासाठी सर्व जिल्हा सह निबंधक कार्यालयांकडून नोंदणी व मुद्रांक विभागास वळती केलेला असणे, सदर वळती केलेले शुल्क नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत नगर विकास विभागाकडून संबंधित मनपा, न.प, मेट्रो महानगर पालिका यांना वितरीत न करणे, अकोला महानगरपालिकेस माहे डिसेंबर २०२४ पर्यंतचे रु. ३०,७९,५८,६२८ तसेच माहे जानेवारी २५ ते मार्च २५ पर्यंतचे रु. ४,६९,४२,२६४ असे एकूण रु.३५,४९,००,९०२ थकीत शुल्क वितरीत न केल्यामुळे अकोला महापालिका आर्थिक अडचणीत येणे, १% अतिरिक्त मुद्रांक

शुल्क अधिभारापोटी नोंदणी व मुद्रांक विभागाकडून सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करिता अनुक्रमे रु. १३,८४,२२,०५०, रु.१३,६१,९६,८८९ व रु. १५,२१,६६,०८३ प्रत्यक्ष वसूल केलेले असणे, अकोला महानगरपालिकेने नगरविकास विभागाकडे मागणी केलेल्या रु.३५,४९,००,९०२ वितरीत करण्यासाठी तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता त्यांच्या कार्य क्षेत्रातील दस्तांची नोंदणी करतांना वसूल केलेल्या १% अतिरिक्त मुद्रांक शुल्काची रक्कम वेळेत वितरीत करणे, याबाबत शासनाकडून करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री. आमश्या पाडवी, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अक्कलकुवा तालुक्यातील नेवासा अंकुश विहीर अंतर्गत येणाऱ्या बाबानगर अंगणवाडी केंद्रावर शांता जयंतलाल तडवी या मदतनीस म्हणून कार्यरत असणे, त्यांना दिनांक १ सप्टेंबर, १९९६ रोजी ५० रुपये मानधनावर पहिली नियुक्ती देण्यात येणे, दिनांक २८ जून, २००६ रोजी ६४० रुपये मानधनावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दुसरी नियुक्ती देण्यात आली असणे, सेवेत असताना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी शांता तडवी यांचे दुःखद निधन होणे, तडवी यांच्या निधनानंतर बाबा अंगणवाडी बाल विकास प्रकल्प अधिकारी पर्यवेक्षिका यांनी संगनमत करून त्यांना मयत न दाखवता त्यांच्या जागी त्यांच्या नावावर दुसऱ्या महिलेला कामावर ठेवणे, त्या महिलेचा फोटो लावून नवीन नियुक्ती मिळालेल्या महिलेच्या बँक खात्यावर मानधन जमा करणे, मयत मदतनीस च्या नावावर काम करणारी महिला व संगनमत करून मदतनिसाला मयत न दाखवता शासनाची दिशाभूल करून दुसऱ्या महिलेच्या नावाने मानधन काढणे, बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्यावर शासनाने कारवाई न करणे, याप्रकरणी स्थानिक आमदार लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे पत्रव्यवहार करून त्याची दखल न घेणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**चार : शासकीय विधेयके :**

**विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडशः विचार व संमत करणे** :-

**(१)** सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग विधेयक, २०२५

**(२)** सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग विधेयक, २०२५

पाच : **(गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री योगेश सागर, अर्जुन खोतकर, दिलीप वळसे-पाटील, सिध्दार्थ शिरोळे, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री दिपक केसरकर, विजय शिवतारे, संजय केळकर, संजय बनसोडे, रमेश बोरनारे, संभाजी निलंगेकर-पाटील, मंगेश कुडाळकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, शेखर निकम, ॲड.पराग अळवणी, राजेंद्र गावित, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री अतुल भातखळकर, प्रकाश सोळंके, प्रदीप जैस्वाल, प्रशांत ठाकूर, अशोक पाटील, अनिल पाटील, किसन कथोरे, शांताराम मोरे, राजकुमार बडोले, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री दिलीप लांडे, महेंद्र थोरवे, श्रीमती सीमाताई हिरे, सर्वश्री प्रताप पाटील-चिखलीकर, महेंद्र दळवी, डॉ.राहुल आहेर, श्री.तुकाराम काते, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री भिमराव तापकीर, निलेश राणे, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीत साटम, सुहास कांदे, सचिन पाटील, रणधीर सावरकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मुरजी पटेल, राम कदम, विश्वनाथ भोईर, दिलीप बनकर, विलास तरे, शरद सोनवणे, कॅ. आर. तमील सेल्वन, डॉ.किरण लहामटे, सर्वश्री राजेश मोरे, मिहिर कोटेचा, प्रवीण दटके, हिरामण खोसकर, पराग शाह, चंद्रकांत नवघरे, शंकर जगताप, कालिदास कोळंबकर, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री संजय उपाध्याय, कुमार आयलानी, मंगेश चव्हाण, राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश लांडगे, रविंद्र चव्हाण, अभिमन्यू पवार, डॉ. अतुल भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री संतोष दानवे, हेमंत रासने, सत्यजित देशमुख, गोपीचंद पडळकर, ॲड. राहुल कुल, सर्वश्री सचिन कल्याण-शेट्टी, सुनिल कांबळे, सुरेश भोळे, विक्रम पाचपुते, डॉ.संजय कुटे, श्री. राजेश वानखडे, श्रीमती रंजनाताई जाधव, सर्वश्री विलास भुमरे, राजेश बकाने, समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किशोर जोरगेवार, सुमित वानखेडे, हरिष पिंपळे, राघवेंद्र पाटील, शिवाजी कर्डिले, सर्वश्रीमती श्वेता महाले, मोनिका राजळे, सर्वश्री चैनसुख संचेती, समीर मेघे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री बबनराव लोणीकर, किर्तीकुमार भांगडिया, प्रशांत बंब, नारायण कुचे, राणाजगजितसिंह पाटील, प्रकाश भारसाकळे, राजू तोडसाम, सुरेश धस, राजेश पवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जितेश अंतापुरकर, डॉ. तुषार राठोड, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुभाष देशमुख, विजय देशमुख, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, अमल महाडिक, धनंजय गाडगीळ, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, काशिनाथ दाते, विजयसिंह पंडित, ज्ञानेश्वर कटके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकाशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे

स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठ्या शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळ्याचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात

मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सहा : (गुरुवार, दिनांक ३ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, सुनिल प्रभू, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. दिलीप सोपल, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पाटील, अजय चौधरी, अमित देशमुख, रोहित पवार, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमीन पटेल, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अस्लम शेख, नितीन देशमुख, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री संजय पोतनीस, बापूसाहेब पठारे, वरुण सरदेसाई, अमित झनक, अनंत (बाळा) नर, अभिजीत पाटील, हारुन खान, शिरीषकुमार नाईक, सिध्दार्थ खरात, संदिप क्षिरसागर, नारायण पाटील, गजानन लवटे, विकास ठाकरे, महेश सावंत, मनोज जामसुतकर, साजिद खान पठाण, प्रविण स्वामी, संजय मेश्राम, रामदास मसराम, संजय देरकर, बाबाजी काळे, हेमंत ओगले, डॉ. ज्योती गायकवाड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याचे कृषी मंत्री सिन्नर तालुक्यात नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करतांना त्यांनी" ढेकळांचे पंचनामे करायचे का ?" असे शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारे केलेले वक्तव्य, जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदार संघात" हर घर सौर" योजनेवरील एका कार्यक्रमात सत्तारुढ पक्षाच्या एका विधीमंडळ सदस्याने " आपल्यामुळे कपडे, बुट, मोबाईल योजनांचे आर्थिक फायदे आणि पेरणी करण्यासाठी पैसे मिळतात" असे शेतकऱ्यांना उद्देशून उद्गार काढणे, मे, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील सर्वच भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार झालेला पाऊस, त्यामुळे अनेक जिल्ह्यात निर्माण झालेली पूरपरिस्थिती, नद्यांचे पाणी पात्राबाहेर जाणे, अनेक ठिकाणी दरडी कोसळून विस्कळीत झालेली वाहतूक, केळी, पेरु, द्राक्ष, डाळींब इत्यादी फळपिकांचे झालेले मोठे नुकसान, राज्य सरकारने नुकसानीबाबत पंचनामे त्वरित करणे व शेतकऱ्यांना दर हेक्टरी ५० हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्याची मागणी, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटपात विविध जिल्ह्यात झालेले भ्रष्टाचार, मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणातील मासेमारी बंद राहिल्याने मच्छिमारांचे झालेले नुकसान, दरवर्षी मे, महिन्यात कोकणात पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु यावर्षी अतिवृष्टीमुळे पर्यटकांची संख्या कमी होणे व पर्यटन व्यवसायावर अवलंबून असणाऱ्या पर्यटन व्यावसायिकांचे झालेले अतोनात नुकसान, दरवर्षी कोकणात साधारणपणे २३ मे पासून भात आणि नागलीची पेरणी सुरु होते, परंतु यावर्षी १५ मे पासूनच

पावसाला सुरुवात झाल्यामुळे पेरणी पूर्वीची कामे न होणे, तसेच रायगड जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांच्या कापणीची कामे सुरु असतांनाच पाऊस सुरु झाल्याने भात मातीत मिसळून पूर्णपणे वाया जाणे, कोकणातील सदरहू परिस्थिती पाहता कोकणातील शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता शासनाने विशेष मदतीचे पॅकेज जाहिर करण्याची लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, विशेष आर्थिक पॅकेज जाहिर करण्याची आवश्यकता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली पिळवणूक, राज्य शासनाने कृषि क्षेत्राला अग्रेसर ठेवण्यासाठी महाॲग्रो एआय धोरणास (२०२५ ते २०२९) शासनाने दिलेली मंजूरी, एका रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, शेतकऱ्यांना कृषी विम्याची रक्कम दिली जात नसून विमा कंपन्यांना कृषि विम्याचा लाभ झाला असणे, संपूर्ण राज्यात बोगस बीटी बियाण्याचा धुमाकूळ सुरु असून यावर्षी बोगस बीटी बियाणे ३० टक्क्यापेक्षा जास्त विकले गेल्याची बाब निदर्शनास येणे, बिटी बियाणांची बिनधास्त विक्री सुरु असून त्यांचे बिंग फुटू नये म्हणून बियाणे लेबलविना, खुल्या पाकिटमध्ये विकले जात असणे, शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणा निवडणूकी अगोदर केली असून अद्यापही सरसकट कर्जमाफीची घोषणा न करणे, कापसाच्या पालवीवर वाणी नावाचा रोग आला असून त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, तसेच शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या धानाचे पैसेही अद्याप मिळालेले नसणे, दि. १ जानेवारी ते ३१ मार्च, २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत विदर्भ व मराठवाड्यातील २६७ शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बऱ्याच कुटुंबियांना अद्यापही आर्थिक मदत न मिळणे, विदर्भातून गोव्याला जाण्यासाठी ८६ हजार कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग करण्याची आखलेली योजना, वास्तविक पाहता या अंतर्गत असलेल्या मंदिरांकडे जाण्यासाठी तयार असलेल्या उत्तम रस्त्यांचे जाळे, शक्तिपीठ महामार्गामध्ये १२ जिल्ह्यातील शेतकरी बाधित होणार असल्याने दि. १.७.२०२५ पासून १२ जिल्ह्यात व संपूर्ण महाराष्ट्रात रास्तारोको आंदोलन शेतकऱ्यांकडून करण्यात येणे, सदर प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या काढून घेण्यात येणाऱ्या सुपिक जमिनी या मार्गासाठी लाखो झाडांची होणारी कत्तल व पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, यासाठी राज्य शासनाने नुकतीच २० हजार कोटीची तरतूद करणे व शेतकऱ्यांच्या विरोध असतांनाही दडपशाही करुन शेतकऱ्यांच्या जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी घेतल्या जाणार असणे, दिनांक २५ व २६ जून, २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर व लोणार तालुक्यातील समृध्दी महामार्ग वाहून जाणे, सदर मुसळधार पावसामुळे सोलार पंपासह संपूर्ण सेट, पाईप लाईन, स्प्रिंकलर सेट, केबल इत्यादी वाहून जाणे, सिबिलची अट व ओटीएस ची अट केल्यामुळे बँकेतर्फे शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज न मिळणे, तसेच राज्य शासनाने नोकरभरतीमध्ये कंत्राटी भरती केली असून कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याच्या अनुषंगाने वेतन मिळालेले नसणे, लिपिकाला १२ हजार, शिपायांना १० हजार इतका तुटपुंजा पगार दिला जाऊन एजन्सीला जास्तीत जास्त फायदा कमवून दिला जाणे, राज्याला प्रगतीपथावर नेण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी देण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सदस्य पदी वादग्रस्त कारकीर्द राहिलेले विशेष पोलिस महानिरिक्षक दिलीप भुजबळ यांची नियुक्ती करण्यात येणे, त्यामुळे कामगारांची व बेरोजगारांची फसवणूक केली जात असणे, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**सात : (१) अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३५ - महाराष्ट्र आवाज प्रदूषण प्रतिबंधक विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७ - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(७)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३८ - मोटार वाहन (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(८)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(९)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० - मुंबई न्यायालय फी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१०)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(११)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ - महाराष्ट्र कामगार स्त्रिया व महिला शेतमजूर (प्रसूती सहाय्य) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४३ - महाराष्ट्र प्रोत्साहनाद्वारे कुटूंब नियोजनाला चालना देण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र कुळवहिवाट आणि शेतजमीन (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि राज्य शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१७)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गास प्रतिबंध) विधेयक, २०२५ - **श्री.रोहित पवार, वि.स.स. यांचे**

**(१८)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(१९)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२०)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ - महाराष्ट्र यंत्रमाग कामगार (नोकरीचे विनियमन व कल्याण) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - औषधिद्रव्ये व सौंदर्यप्रसाधन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - महाराष्ट्र धर्मगुरु, ऐतिहासिक महापुरुष आणि राष्ट्रीय व्यक्तिमत्वांचा अपमान (प्रतिबंध आणि शिक्षा) विधेयक, २०२५ - **श्री.रईस शेख, वि.स.स. यांचे**

**(२५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ - महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (चौथी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२५- **श्री.अजय चौधरी, वि.स.स. यांचे**

**(२७)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२८)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२९)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६३ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारण) विधेयक, २०२५ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(३०)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६४ - मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

**(३१)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६७ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३३)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६९ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३४)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७० - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३५)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७१ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तिवेतन देण्याबाबत विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(३६)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७२ - महाराष्ट्र राज्यातील जेष्ठ नागरिक (सेवा, सुविधा इत्यादी देण्याबाबत) विधेयक, २०२५ - **डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील, वि.स.स. यांचे**

**(ब) विचारार्थ :-**

(१) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२५ - **सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे**

(२) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(३) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

(४) सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२५ - **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे**

**(२) अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावांच्या सूचना) (क्रमांक १ ते ३)**

**(१) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा ठराव क्र. १०३**

"राज्यात अनेक ठिकाणी रस्ते अपघात होऊन दरवर्षी हजारो नागरिकांचे प्राण या अपघातात गमवावे लागणे, राज्याचे राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवर मोठ्या प्रमाणामध्ये अशा प्रकारचे अपघात होत असणे, हे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालयेही आसपास नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांवर आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान उपचार केंद्र सुरु करण्याची आवश्यकता असणे, तसेच या उपचार केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक देखील करण्याची आवश्यकता असणे, राज्य महामार्ग व राष्ट्रीय महामार्गांवर पन्नास किलोमीटर अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उघडल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचवणे शक्य होणार असणे व यामधून दरवर्षी वाढत असलेली अपघातातील मृतांची संख्या देखील आटोक्यात आणण्यास निश्चितच मदत होणार असणे, तरी शासनाने राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गांवरील अपघातग्रस्तांच्या बचावासाठी ट्रॉमा सेंटर (Trauma Center) उभारण्याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(२) श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांचा ठराव क्र. ३३**

"राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात यावीत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व पुरातन किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**(३) श्री. राजकुमार बडोले, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४३**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली

असणाऱ्या कुटूंबांना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे रुपये ५०,००० इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.